Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 14, Issue 4 – Dec 2024
Impact Factor : 7.665
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
UGC CARE I

# जळगाव जिल्ह्यातील महिलांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान

**सुनीताबाई भगवान पाटील,** संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग, एस. पी. डी. एम. आर्ट्स, एस. बी. बी. आणि एस. एच. डी. कॉमर्स आणि एस. एम. ए. सायन्स कॉलेज ता. शिरपूर जि. धुळे
**प्रा. डॉ. मनीषा जगदीशलाल वर्मा,** संशोधन मार्गदर्शक, इतिहास विभाग, एस. पी. डी. एम. आर्ट्स, एस. बी. बी. आणि एस. एच. डी. कॉमर्स आणि एस. एम. ए. सायन्स कॉलेज ता. शिरपूर जि. धुळे

**प्रस्तावना:**

स्वातंत्र्योत्तर काळात भारतात अनेक सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक बदल घडून आले, आणि या परिवर्तनाच्या प्रक्रियेत महिलांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा ठरला. जळगाव जिल्ह्यातील महिलांनीही या कालखंडात शिक्षणाच्या क्षेत्रात लक्षणीय योगदान दिले आहे. पारंपरिक बंधनांमधून बाहेर पडत त्यांनी शिक्षणाचा ध्यास घेतला आणि इतर महिलांसाठी आदर्श निर्माण केला. शिक्षिका, प्राचार्या, प्राध्यापिका, सामाजिक शिक्षण कार्यकर्त्या अशा विविध भूमिकांमधून त्यांनी जिल्ह्याच्या शैक्षणिक विकासात मोलाचे योगदान दिले. त्यांनी ग्रामीण भागातही शिक्षणाचा प्रसार घडवून आणला आणि मुलींना शाळेत आणण्यासाठी जनजागृती केली. शिक्षण हे स्त्री सबलीकरणाचे प्रमुख माध्यम आहे, हे त्या कृतीतून सिद्ध करत होत्या. त्यांच्या या कार्यामुळे जळगाव जिल्ह्यातील शैक्षणिक चित्र बदलले असून, नव्या पिढीला प्रेरणादायी वाटचाल करण्यासाठी योग्य दिशा मिळाली आहे.

**विषय प्रवेश:**

आज मानवी जीवनात शिक्षण हा विषय अतिशय महत्वाचा मानला जात आहे. जिल्ह्यात शिक्षणाचा प्रचार व प्रसार फार झपाट्याने होताना दिसतो. जिल्ह्यात शिक्षणाचा प्रसार वाढताना दिसतो. राज्यात शिक्षणाला महत्वाचे स्थान दिले आहे. जीवन व शिक्षण यांचा घनिष्ट संबंध असल्यामुळे जीवन जगत असतांना शिक्षण मिळत असल्यामुळे जीवनाचे ध्येय तेच शिक्षणाचे ध्येय असते. म्हणून जीवनाप्रमाणे व्यक्ति विकास व समानतेचाही शिक्षणाची मुख्य ध्येय बनतात.

श्रीमती शरदचंद्रिका पाटील यांचा जन्म जळगाव जिल्ह्यात झाला लहानपणा पासून त्यांना शिक्षणाची व समाजकार्याची आवड होती. हा वारसा त्यांना त्यांच्या आई-वडिलांकडून मिळाला होता. 6 जून 1982 रोजी शिक्षणशास्त्र महाविद्यालयामध्ये संस्थेमध्ये महाराष्ट्रातील जिल्हाधिकारी व शिक्षण अधिकारी यांचे तीन दिवशीय वार्षिक परिषद श्रीमती शरदचंद्रिका पाटील यांनी लावली होती, त्या वार्षिक परिषदेमध्ये सर्वांना मार्गदर्शन केले होते. या तीन दिवस चाललेल्या परिषदेचा समारोप त्यांनी केला.

1982 ला शिक्षणमंत्री खाते मिळाले त्यावेळी त्यांनी अनेक विधायक योजना चालू करून शिक्षणखात्यामध्ये एक नवा आदर्श निर्माण केला. त्यावेळी शिक्षण खात्यांवर मंत्री असतांना अनेक संकटे, आव्हाणे आली त्यावेळी योग्यप्रकारे सर्व प्रकरणे हातळून परिस्थिती शांत केली. तेव्हा त्याचा प्रशासकिय गुणाची कसोटी लागली. अनेक वेळा आर्थिक कष्ट सहन करावे लागले. तरि अतिशय चांगले व स्तुत्य काम त्यावेळी केले ग्रामीण भागातील गोरगरिब, शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे ती आपली सर्वांची जबाबदारी आहे. त्याकाळी 438 कोटि खर्च करून दर्जेदार शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. तेव्हा त्या



Copyright © | JET Network, All Rights Reserved

जनतेला विचारतात कि आम्ही शिक्षणावर एवढा खर्च केला, तो योग्य रितीने झाला कि नाही, हे पाहणे आपणासर्वांचे कर्तव्य आहे."[1]

12 एप्रिल 1982 रोजी मंत्रालयात शिक्षण खात्यातील सर्ववरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक श्रीमती शरदचंद्रिका पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बोलविण्यात आली होती. त्या कार्यक्रमाची अध्यक्षताही त्यांनीच केली होती. अंदाज पत्रकातील मागण्याबाबत, सखोल चर्चा व्हावी. अधिकाऱ्यांच्या अडचणी व अपेक्षा समजून घेतात व अधिकाधिक रक्कम कशी मिळेल, या उद्देशाने व उद्बोधक चर्चा व्हावी, हा उद्देश त्या मागचा होता. सदर बैठक ही 3 तास चालली होती.

चोपडा येथे 3 ऑक्टोबर 1982 रोजी मा. मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले यांच्या हस्ते अनेक कार्यक्रम पार पाडले. त्या प्रसंगी वनमंत्री तत्कालीन श्री. डी. डी. चव्हाण हेही उपस्थित होते. त्या प्रसंगी मा. मुख्यमंत्री म्हणाले होते कि, सौ. शरदचंद्रिका पाटील या अतिशय प्रामाणिक, कष्टाळू मंत्री आहेत. शैक्षणिक क्षेत्रात अतिशय महत्वाचे योगदान त्यांनी दिलेले आहे, ते कुणालाही नाकारता येणार नाही. हजारो विद्यार्थी त्यांच्या संस्थेत घडले आहेत. व देशाची समाजाची सेवा करीत आहेत, त्यांचे आम्हाला कौतूक वाटते. तसेच जिल्ह्यातील ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणात विकासही केला आहे. त्यांच्या कार्याने आम्हा सर्वांचे लक्ष वेधले, अशा प्रकारे मा. मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या शैक्षणिक कार्याचे सर्व जनतेसमोर कौतूक केले होते."[2]

श्रीमती लिलाताई पाटील यांनी सुरुवातीच्या कालखंडामध्ये सेवाभावी संस्था चालू केल्या. त्या माध्यमातून जिल्ह्यातच नव्हे तर महाराष्ट्रभर शिक्षणाचा प्रचार-प्रसार केला. सन 1916 मध्ये जळगाव येथे म्युनिसिपालिटीच्या माध्यमातून न्यू इंग्लिश स्कूल चालू केले. सन 1917 मध्ये पूर्व खानदेश मराठा विद्या प्रसारक मंडळाची जळगाव येथे स्थापना केली. याच वर्षी फैजपूर येथे एज्युकेशन संस्थेची स्थापना केली. पुढे सन 1918 मध्ये चोपडा येथे न्यू इंग्लिस स्कूल सुरु करण्यात आले.

सन 1919 मध्ये चाळीसगाव एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. सन 1922 मध्ये भालोदा येथे न्यू इंग्लिस स्कूल सुरु केले. सन 1923 मध्ये जळगाव म्युनिसिपालिटी उर्दू बॉईज स्कूल काढले. नोव्हेंबर 1929 मध्य पू. खानदेश मुस्लिम एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून शिक्षणाला चालना दिली. जळगाव येथे सन 1931 साली ला. ना. हायस्कूलची सुरुवात करण्यात आली.[3]

गरीब, होतकरू विद्यार्थ्यांकरिता वस्तीगृह चालू केले. शिक्षण विषयक सुधारणा करून जिल्ह्याचा विकास करण्याचा प्रयत्न केला. 11 एप्रिल 1948 रोजी पू. खानदेश बाल शिक्षण संस्थेमार्फत पहिलेच बालक मंदिर सुरु करण्यात आले. संयुक्त खानदेशातील हे पहिलेच बालक मंदिर असल्याची माहिती उपलब्ध दिसते.

श्रीमती स्मिता वाघ यांचा 'शिक्षण' हा आवडता विषय जिल्हा परिषदेच्या शाळेत वर्ग खोल्याची गरज विचारात घेऊन 2010-11 मध्ये जिल्ह्यात 378 वर्ग खोल्याचे बांधकाम हाती घेण्यात आले. सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत एक कोटी दहा लाख अनुदान यासाठी वितरीत करण्यात आले. 28 माध्यमिक शाळांना अद्यावत प्रयोगशाळा, संगणक कक्ष, कला, कार्यानुभव कक्ष, ग्रंथालय आदी भौतिक सुविधा उपलब्ध करून दिल्या. विद्यार्थ्यांच्या शालेय आरोग्याची काळजी घेण्यासाठी संपूर्ण स्वच्छता अभियाना अंतर्गत जिल्ह्यातून 827 शाळांमध्ये शौचालय टप्याटप्याने उपलब्ध करून देण्यात आले. तसेच जि. प. शाळेमध्ये 3669 शौचालय बांधकामासाठी 7 कोटी 33 लाख 80 हजार रुपये निधी खर्च करण्यात आला."[4]

1 हजार विद्यार्थ्यांची आणि 100 अनाथ, निराधार मुलींची माता अशी ओळख ज्यांची आहे, त्या म्हणजे, डॉ. प्रज्ञाताई जंगले. अनेक लेख, पुस्तके आणि नियतकालिकातून नैमितिक लेखन करून समाज प्रबोधन



Copyright © | JET Network, All Rights Reserved

केले आहे. शैक्षणिक संस्थामध्ये विविध स्पर्धा कार्यशाळा, शिबिरे, व्याख्याने आदीचे आयोजन राष्ट्रीय स्तरावर चर्चासत्रे व संमेलनात सहभाग व सादरीकरण आदीचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल.

तळागाळातील मुलांना घेऊन त्यांना शाळेत आणण्याचे मोठे काम साधनाताई भालेराव यांनी केले. गेल्या 10 वर्षापासून त्यांचा हा शैक्षणिक उपक्रम चालू आहे. 2006- 2007 मध्ये साधनाताई भालेराव यांनी गोर-गरीब वस्तीत जाऊन शाळेत न जाणाऱ्या मुलांचा शोध घेऊन त्यांच्या पालकांना शिक्षणाचे महत्व पटवून देऊन शाळेत घालण्याचे महान काम हे साधनाताई भालेराव यांनी केले.”[5]

श्रीमती सरस्वतीबाई चौधरी या जळगाव जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्त्या आहेत. जिल्ह्यातील शैक्षणिक कार्यामध्ये त्यांचे अनमोल योगदान आहे. म्हणून त्यांच्या कार्याचे विश्लेषण खालील प्रमाणे केले आहे. जळगाव जिल्ह्याच्या महिला विकासामध्ये त्यांचे कार्य हे अनन्य साधारण आहे. भुसावळ येथे अखिल भारतीय महिला परिषदेच्या या कार्यकर्त्याच्या प्रयत्नातून 17 ऑक्टोंबर 1937 रोजी जळगाव येथील लेखिका सौ. आनंदीबाई शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली भुसावळ येथील थिअटर मध्ये ‘पूर्व खानदेश महिला परिषद’ भरविली होती. चाळीसगाव, जळगाव, एरंडोल, तसेच पूर्व खानदेशातील इतर तालूक्यातील महिलांना आमंत्रित करण्यात आले. मुला-मुलींच्या प्राथमिक शिक्षणासाठी जास्तीत-जास्त महिला शिक्षिका तयार करण्यात आल्या. प्रौढ शिक्षणाचे वर्ग रात्रीला चालू केले.

दुय्यम शिक्षण व व्यवसायीक शिक्षण मुलींना स्वतंत्रपणे दिले गेले. हा प्रथमच प्रयोग त्यांनी केला. त्यांनी जास्तीत-जास्त महिला शिक्षणावर भर दिला. पश्चिम खानदेशातील भिल्ल जातीच्या मुलींच्या शिक्षणाची त्यांनी प्रयत्न केल्याचे दिसते. मुलींच्या राहण्याचीही व्यवस्था करण्यात आली. 65 मुली या त्या शाळेत शिकत होत्या. त्याविषयी आदिवासी सेवक ‘ठक्करबाप्पा’ यांनी त्यांना एक पत्र लिहिले होते, या पत्रात त्यांच्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले होते. 14 मार्च 1948 मध्ये जळगाव येथे झालेल्या संयुक्त खानदेश परिषदेमध्ये देखील गिरिजाबाई केळकर यांच्या पुढाकाराने स्त्री विषयक ठराव मांडण्यात आले होते. पुढे महिला शिक्षणाचा कार्याला प्रभाव वाढत गेला.

खानदेशातील स्त्री समाजाला त्यांचे विचार व कार्य हे प्रेरणादायी ठरले आहे. संयुक्त खानदेशातील हे कार्य स्त्री चळवळीच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरलेले दिसते. त्याचे कार्य हे तरुणासाठी प्रेरणादायी ठरते आहे. त्यांचे कार्य महिलांच्या सबलीकरणापुरते मर्यादित नसून त्यांनी समाजासाठी ही कार्य केल्याचे दिसते. जळगाव जिल्ह्यातील महिलांच्या शालेय शिक्षणासाठी आपले महत्वपूर्ण योगदान दिलेले दिसते. महिलांच्या शिक्षणामुळे त्यांना नोकरीच्या संधी या उपलब्ध होण्यास मदत झाली आहे.”[6]

श्रीमती विमलाबाई चौधरी या जळगाव जिल्ह्यातील महत्वाच्या महिला सामाजिक कार्यकर्त्या आहेत. जिल्ह्याच्या विकासामध्ये मोलाचे योगदान दिसते. त्यांनी आपल्या कार्याची सुरुवात ही मिशनऱ्यांपासून केलेली दिसते. त्यामुळे जळगाव जिल्ह्याच्या त्यांच्या नावाला एक वलय मिळालेले आहे. त्यांनी जास्तीत-जास्त लोकांशी संपर्क साधून, लोकांची बोलीभाषा शिकून, बाजार, चावडी, धर्मशाळा, यात्रा, ऊरुस अशा ठिकाणी भेट देऊन लोकांशी चर्चा करून लोकांचा विरोध होऊन सुद्धा शाळा चालविणे, लोकांना औषध उपचार करणे, इ. कार्य त्या करत असत.

ख्रिस्ती धर्माची तत्वे, इंग्रजी व्याकरण, इतिहास, भूगोल या विषयाचा अभ्यास त्या विद्यार्थ्यांना शिकवित असत. ख्रिश्चन मुला-मुलींना एकत्र त्यांना शिकविण्याचे काम त्या करत असत. त्यांनी अनेक ठिकाणी शाळा चालविल्या, त्यामध्ये चाळीसगाव, भुसावळ, एरंडोल, पाचोरा, मुक्ताईनगर यांचा समावेश होतो.



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 14, Issue 4 – Dec 2024 Impact Factor : 7.665
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
UGC CARE I

विविध ठिकाणी जाऊन विशेष आदिवासी, भिल, कातकारी जमातीच्या मुलांना शिकविण्याचे महत्वपूर्ण कार्य त्यांनी केले आहे. अनेक ठिकाणी निवासी शाळा, वस्तीगृहे चालवून मुलांच्या शिक्षणाला प्रेरणा, दिशा देण्याचे कार्य त्यांनी केले.

श्रीमती विमलाबाई चौधरी यांनी खानदेशात 20 शाळा त्यांनी चालविल्या. भुसावळ येथे स्वतःच्या जागेवर शाळा उभी केली. त्या संस्थेतून हजारो विद्यार्थी हे घडत आहेत. तसेच या कामामध्ये चॅपलेन (धर्मगुरु) यांनी मदत केली होती. ते स्वतः भुसावळ येथे भेट देण्यासाठी आले होते. त्यांना रेल्वे प्रशासनाने पण मदत केल्याचे कळते. विशेष गरीब लोकांसाठी आश्रम व्यवस्थाहि करण्यात आली होती. त्यांचे खानदेशातील शिक्षणातील कार्य हे उच्चकोटीचे मानले जाते. हिंदूंच्या मुलांसाठी ही विशेष शाळा चालू केल्या होत्या. अशा प्रकारे त्यांनी आपले जीवन शैक्षणिक कार्यासाठी समाजाला अर्पण केले.[7]

श्रीमती उज्वला कुलकर्णी यांचे जळगाव जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रामध्ये महत्वपूर्ण असे योगदान राहिले आहे. सामाजिक क्षेत्रा बरोबरच शैक्षणिक कार्यामुळे जिल्ह्यात एक नवा आदर्श निर्माण झाला आहे. एखाद्या तरुणालाही लाजवेल असे त्यांचे काम दिसते. सामाजिक दृष्ट्या महिलांना सक्षम करण्यासाठी त्यांनी विविध स्वरुपाचे उपक्रम त्या राबविताना दिसतात. त्यांच्या या अभिनव प्रयोगामुळे जिल्ह्यातील महिलांना नवे जीवनमान मिळालेले दिसून येते.

श्रीमती रोहिणीताई खडसे यांचे जळगाव जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रात अत्यंत मोलाचे योगदान आहे. त्यांच्या वडिलांकडून त्यांनी सामाजिक कार्याची प्रेरणा घेतली. कार्य करत असताना अनेक अडचणी, संकटे, आणि चढ-उतारांचा सामना करावा लागला, तरीही त्या कधीच मागे हटल्या नाहीत. त्या आजही सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात सक्रियपणे कार्यरत आहेत.

जिल्ह्यात शिक्षणाचा प्रसार आणि विशेषतः महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी त्या सातत्याने प्रयत्नशील राहिल्या. महिलांना मार्गदर्शन करून, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणारे कार्य त्यांनी केले आहे. प्राथमिक शिक्षणात मुलींचा सहभाग वाढवण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. ग्रामीण भागात इंग्रजी माध्यमाच्या शाळा स्थापन करून हजारो गरीब व वंचित मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले. महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्यांनी ठोस पावले उचलली, तर आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्कांसाठी थेट पंतप्रधानांपर्यंत पाठपुरावा केला. त्यांच्या हक्कांचे रक्षण व्हावे यासाठी त्यांनी संघर्ष केला. "समाजसेवा ही केवळ बोलण्याने होत नाही, तर प्रत्यक्ष कृतीतून ती सिद्ध करावी लागते,"[8] हे त्यांनी आपल्या कार्यातून सिद्ध करून दाखवले. त्यांच्यावर प्राणघातक हल्ले झाले तरीही त्या अढळ राहिल्या. त्यांनी अनेक आश्रमशाळा स्थापन करून विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी दिली. आपले संपूर्ण जीवन त्यांनी समाजाच्या सेवेकरिता अर्पण केले. रोहिणीताई खडसे या काळाच्या जिवंत, सशक्त आणि अर्थपूर्ण प्रतीक आहेत. त्यांना शिक्षणाविषयी आस्था आहे आणि समाजाप्रती गाढ तळमळ आहे. त्यांनी जिल्ह्याला नैतिक दिशा देत समाजासाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्व घडवले आहे.

**निष्कर्ष :**

1. स्वातंत्र्योत्तर काळात जळगाव जिल्ह्यातील महिलांनी शिक्षण क्षेत्रात नेतृत्वाची भूमिका बजावली. त्यांनी शाळा, वसतीगृह, प्रशिक्षण संस्था उभारून शिक्षणाच्या प्रसाराला गती दिली. त्यांच्या कृतीमुळे ग्रामीण व वंचित वर्गातील मुलामुलींना शिक्षणाची संधी मिळाली.



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 14, Issue 4 – Dec 2024 Impact Factor : 7.665
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
UGC CARE I

2. महिला कार्यकर्त्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाज प्रबोधन घडवले. शिक्षणामुळे स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला आणि सामाजिक भान वाढले. हे परिवर्तन संपूर्ण जिल्ह्याच्या सामाजिक परिवर्तनाचे अधिष्ठान ठरले.
3. महिलांनी फक्त संस्था स्थापन केल्या नाहीत, तर स्वतःही शिक्षक बनून कार्य केले. लिलाताई पाटील, विमलाबाई चौधरी यांसारख्या महिला संस्थापकांनी शिक्षण संस्थांची घडी बसवली आणि गुणवत्तेचा आग्रह धरला.
4. आदिवासी, भिल्ल व गरीब मुलांच्या शिक्षणासाठी अनेक महिलांनी आश्रमशाळा, वसतीगृह व विशेष शिक्षण योजना राबवल्या. या कार्यामुळे शैक्षणिक विषमतेवर प्रभावी उपाय झाले आणि समाजातील दुर्बल घटक शिक्षणप्रवाहात आले.
5. श्रीमती सरस्वतीबाई चौधरी, रोहिणीताई खडसे यांसारख्या कार्यकर्त्यांनी मुलींच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न केले. त्यांनी महिला शिक्षिका तयार करून ग्रामीण भागात स्त्री शिक्षणाचा प्रचार केला. यामुळे महिला सक्षमीकरणाला गती मिळाली.
6. श्रीमती शरदचंद्रिका पाटील यांच्या कार्यकाळात शिक्षण खात्याला विधायक दिशा मिळाली. त्यांनी निधीचा योग्य वापर करून शिक्षण सुविधा उभारल्या. प्रशासन व जनतेमधील संवादातून शिक्षणात पारदर्शकता व उत्तरदायित्व निर्माण झाले.
7. सामाजिक कार्यकर्त्यांनी शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे साधन मानले. प्रज्ञाताई जंगले, साधनाताई भालेराव यांच्यासारख्या महिलांनी शिक्षणाचं महत्त्व ओळखून ते समाजात रुजवण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या कार्यातून नवीन पिढी तयार झाली.
8. या महिलांनी आपल्या जीवनकार्यातून समाजासमोर आदर्श ठेवले. संकटं, विरोध, आर्थिक अडचणी यांचा सामना करून त्यांनी शिक्षणाचा ज्योत पेटवला. "समाजसेवा ही कृतीतून सिद्ध करावी लागते" हे त्यांनी आपल्या कार्यातून खऱ्या अर्थाने साकारले.

**संदर्भ ग्रंथ :**

1. श्रीराम पाटील, 'सातपुड्यातील संजिवनी', योगेश प्रकाशन, विश्वासनगर औरंगाबाद, 29 फेब्रुवारी 1984 पृ. क्र. 45
2. सबनीस श्रीपाल, (संपादक), 'महाराष्ट्रातील इतिहासातील स्त्रियांचे योगदान', विद्यावर्धिनी महाविद्यालय धुळे, 2007, पृ. क्र. 14
3. दैनिक वार्ता धुळे, दि. 3 जानेवारी 1995, पृ. क्र. 2
4. डॉ. शुभांगी गोटे, स्त्री परिवर्तनाची आव्हाने, साऊथ एशियन सोशल रिसर्च पब्लिकेशन, 2013, पृ. क्र. 157
5. दिनेश दीक्षित, वेगळी वाट, अथर्व पब्लिकेशन्स, जळगाव ऑगष्ट 2018, पृ. क्र. 199
6. प्राचार्य. डॉ. भी. ना. पाटील, खानदेशातील समाज प्रबोधनाची चळवळ, (1990 -1995), प्रकाशक भूषण भिमराव पाटील, 11 जून 2005, पृ. क्र. 292
7. उपरोक्त, पृ. क्र. 298
8. माने डॉ. शशिकांत, सामाजिक कार्य व सामाजिक सुधारणा: एक अभ्यास, अंकित प्रकाशन, पुणे, पृ. क्र. 29



Copyright © | JET Network, All Rights Reserved